यादृच्छिक कारखाने निरीक्षण योजनेस (Randomisation Inspection Scheme) मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्र.एफएसी-२०१५/प्र.क्र.११८/काम-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ जून, २०१५.

**पहा :** संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यांचे पत्र क्र.संऔसुवआ/सूट/८३२४/१, दिनांक २८.०५.२०१५.

## परिपत्रक

'मेक इन इंडिया' च्या धर्तीवर 'मेक इन महाराष्ट्र' अभियान राबविण्याचा संकल्प राज्य शासनाने सोडला असून त्या अंतर्गत उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी, कारखान्यांचे गुणनियंत्रण करण्यासाठी तसेच कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे हित जोपासण्यासाठी विशिष्ट कार्यप्रणाली राबविण्यात यावी, असे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने कारखाने अधिनियम, १९४८ च्या प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी कारखान्यांचे यादृच्छिक निरीक्षणे (Random Inspection) करण्याच्या अनुषंगाने यादृच्छिक कारखाने निरीक्षण योजना (Randomization Inspection Scheme) तयार करण्याचा शासनाचा विचार आहे. त्या अनुषंगाने औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास देण्यात आलेल्या सूचनांनुसार संचालनालयाने कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत असणाऱ्या कारखान्यांचे निरीक्षण करण्यासाठी राज्यस्तरीय निरीक्षण समितीची स्थापना करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे. या समितीची संरचना, कार्यपध्दती, निरीक्षण, अपघात व तक्रार चौकशीची गुणवत्तापूर्वक कार्यप्रणाली निश्चित करुन त्याची अंमलबजावणी करणे अभिप्रेत आहे.

राज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या कारखान्याचे अधिक प्रभावीपणे निरीक्षण व्हावे तसेच त्यामध्ये पारदर्शकता रहावी आणि एकंदरीत कार्यप्रणालीमध्ये सुसूत्रता असावी व त्याबाबत कालबध्द कृती आराखडा निश्चित असावा या उद्देशाने कारखाने निरीक्षणासाठी पुढीलप्रमाणे राज्यस्तरीय निरीक्षण समिती (SLIP) तसेच गुणवत्तापूर्वक कार्यप्रणाली (SOP) निश्चित करण्यात येत आहे.

**१) राज्यस्तरीय निरीक्षण समितीची [State Level Inspection Agency] संरचना पुढीलप्रमाणे असेल :-**

| अ.क्र. | पदनाम | हुद्दा |
|---|---|---|
| १. | संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | अध्यक्ष |
| २. | संबंधित विभागाचे अपर / सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | सदस्य |
| ३. | उप संचालक, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | सदस्य |
| ४. | अपर संचालक, संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | सदस्य सचिव |

२) राज्यस्तरीय निरीक्षण समितीची (SLIA) कार्यपध्दती पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

१. सदरहू राज्यस्तरीय निरीक्षण समिती (SLIA) कारखाने अधिनियम, १९४८ अंतर्गत नोंदणीकृत कारखान्यांच्या यादीतून एकूण कारखान्यांच्या ५ % कारखान्यांची यादी प्रत्येक महिन्याकरीता Randomisation पध्दतीने तयार करेल. या प्रयोजनार्थ कारखान्यांची वर्गवारी व त्याबाबतची टक्केवारी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कारखान्याचा प्रकार | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अति धोकादायक (MAH) | १ |
| २. | रासायनिक (Chemical and २ (cb)) | २ |
| ३. | १०० पेक्षा जास्त कामगार असलेले सर्वसाधारण कारखाने | १ |
| ४. | १०० पेक्षा कमी कामगार असलेले सर्वसाधारण कारखाने | १ |

२. सदर समिती कारखाना निरीक्षणाची यादृच्छिक (Randomised) यादी निश्चित करेल, निरीक्षण प्रणालीवर देखरेख करेल, यासाठी मुख्यालय व विभागीय कार्यालये यामध्ये समन्वय साधेल, निरीक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी कृती आराखडा तयार करेल, तसेच कारखाना निरीक्षण, अपघात चौकशी व तक्रार चौकशी याबाबतच्या शासनाने मान्यता दिलेल्या Template नुसार कारखान्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारींचे निराकरण करेल.

३. सदर समिती कारखाना निरीक्षणाची यादी यादृच्छिक (Randomisation) पध्दतीने तयार करताना अति धोकादायक आणि रासायनिक कारखान्यांची प्राधान्याने निवड करेल आणि वर्षातून एकदा निरीक्षण पूर्ण होईल याची खात्री करेल. निरीक्षण करावयाच्या प्रत्येक विभागातील कारखान्याची यादी निश्चित केल्यानंतर संबंधित विभागीय कार्यालय प्रमुखांना प्रत्येक महिन्याच्या सुरवातीला देण्यात येईल.

४. त्यानुसार विभागीय प्रमुख त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या उप/सहायक संचालकांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील निरीक्षण करावयाच्या कारखान्यांची यादी आदल्या दिवशी देतील.

५. उप / सहायक संचालक कारखान्यांचे दुसऱ्या दिवशी त्याबाबत निरीक्षण करुन त्यांचा निरीक्षण अहवाल संबंधित Template नुसार ७२ तासाच्या आत वेबसाईटवर (www.mahakamgar.gov.in) अपलोड करतील. यासाठी Accenture, माहिती तंत्रज्ञान सल्लागार हे mahaonline यांच्या सहकार्याने कार्यपध्दती विकसित करतील व त्याची लिंक www.mahakamgar.gov.in यांना करतील.

६. निरीक्षण अहवाल अपलोड करण्याची कार्यपध्दती mahaonline तयार करेल. सदर कार्यपध्दती मध्ये सर्व उप / सहायक संचालक यांना User ID व Password देतील.

७. उप/सहायक संचालक यांनी निरीक्षण केल्यानंतर ७२ तासांच्या आत निरीक्षण अहवाल वेबसाईटवर अपलोड न केल्यास त्यांच्याकडून स्पष्टीकरण विचारण्यात येईल.

८. मागील महिन्यात निरीक्षण न झालेल्या कारखान्यांचा आढावा घेऊन पुढील महिन्यात निरीक्षण करावयाच्या कारखान्यांचे Randomised Inspection करण्याचे वेळी सदर निरीक्षण न झालेले कारखाने विचारात घेईल.

९. चालू वर्षात Randomisation ने निश्चित केलेल्या कारखान्यांचे निरीक्षण पूर्ण झाल्यानंतर पुढील वर्षात Randomisation नुसार निरीक्षण करावयाच्या कारखान्यांची निवड करताना अति धोकादायक आणि रासायनिक कारखान्यांची प्राधान्याने निवड करतील. या शिवाय मागील वर्षी निरीक्षण न झालेल्या कारखान्यांचा निरीक्षण करण्याकरीता समावेश करण्यात येईल.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने या संदर्भातील SOP तसेच Templates याबाबतची प्रपत्रे संचालनालयाकडे स्वतंत्रपणे पाठविण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(केशव स. जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव.
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
५) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
६) प्रधान सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
७) महासंचालक, प्रसिध्दी संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना सदर शासन निर्णयाला व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह.
८) सह सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
९) सर्व सह सचिव / उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग.
१०) मंत्रालयीन सर्व विभाग.
११) कामगार आयुक्त, मुंबई
१२) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई.
१३) सर्व अप्पर/सह/उप सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

} यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रकास व्यापक प्रसिध्दी दयावी. तसेच कार्यालयातील नोटीस बोर्डवर परिपत्रकाची प्रत प्रदर्शित करावी.

१४) निवड नस्ती (कामगार-४)